नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २३/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. उमरेड**:– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मकरधोकडा उमरेड येथे दि. ०८/०८/२०२२ ते दि २०/०८/२०२२ चे १२.०० वा. अज्ञात आरोपीने मकरधोकडा येथील बी एस एन एल टावर व बाजुला लागलेला सेल्टर बॉक्सची पेटीमधुन १) ३ कंबाइनर अल्काटेल कंपनीची प्रत्येकी ३०००/–रू. प्रमाणे एकुण ९,०००/–रू., २) टि आर इ अल्काटेल कंपनीची प्रत्येकी ४,०००/–रू. प्रमाणे एकुण १२,०००/–रू., ३) वायफाय बॅटरी इमरसन कंपनीची प्रत्येकी ३,०००/–रू. प्रमाणे एकुण ९,०००/–रू., ४) एक सेट ४०० ए एच पावरची अमर राजा कंपनीची २४ सेल किंमती ७२,०००/–रू. चा असा एकुण १,०२,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– केशव मोडकु राउत वय ४५ वर्ष रा. डव्वा त गोरेगाव जि. गोंदिया ह.मु. जिचकार हॉल जवळ विलास मदनकर यांचे घरी इतवारी पेठ उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भोजराज झाडे मो.नं. ८९९९४३४२७२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मेंडकी शिवर येथे दि. १५/८/२२ चे ००/०० वा. ते दि. १६/०८/२२ चे ११.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– चंद्रकांत दामोधर फुकट, वय ४८ वर्ष, रा. सेमीनरी हिल्स, नागपुर हे मेंडकी येथे कनिष्ठ दुरसंचार अधिकारी बीएसएनएल काटोल या पदावर कार्यरत असून तेथे सागर राजेंद्र नागदेवे हा टेक्नीशियन म्हणून देखरेख करतो. दि १५/०८/२२ रोजी रात्री दरम्यान तेथील बॅटरी २०० एच. अमरराजा कंपनीची व आरएफ केबल अंदाजे १८० मिटर नसल्याचे आढळुन आले. तशी फिर्यादी यांना फोनवर माहीती दिल्याने दि. १९/०८/२२ रोजी तेथे गेले असता, बॅटरी किंमती १५,०००/–रूपये व केबल वायर किंमत १०,०००/–रूपये असा एकुण कि. २५,०००/– रूपयाचा माल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार पंचफुला मोरे मो.नं. ९०४९६०७११५ या करीत आहे.

**३) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा पंचधार येथे दि. १३/०८/२२ चे १०.०० वा. ते दि. १५/०८/२२ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— चंद्रशेखर नत्थुजी मदनकर, वय ३९ वर्ष, रा.मोहगाव भदाडे ता.नरखेड जि.नागपूर हे लेबर कान्ट्रॅक्टर चे काम करतात. यातील आरोपी क्र. १) योगेश लखे व २) एक साथीदार हे फिर्यादीकडे लेबरचे काम करतात. आरोपीने आपले साथीदारासह संगणमत करून फिर्यादीचे एम.एस. इबी.सी.चे इलेक्ट्रीक सामान १) कन्डक्टर/जर्मन तार १२० किलो चे बंडल किमती २५,०००/—रू. २) चिल्लर कन्डक्टर/जर्मन तार ६०किलो किमती १०,०००/—रू., ३) लोखंडी नट बोल्ट ४० किलो किमती २,०००/—रू. व ४) लोखंडी क्लॅम अंदाजे ३० किलो किमती २,०००/—रू. असा एकुण कि. ३९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३८१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दारासिंग राठोड मो.नं.९८६०४२७९०२ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मांढळ वार्ड क्र ०६ येथे दि. १०/०८/२२ चे ०६.०० वा. ते दि. २२/०८/२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शिवदास गुलाबराव धांडे, वय ४१ वर्ष, रा. जंगली करांडला ता. उमरेड जि. नागपुर यांचे मांढळ वार्ड क्र. ०६ येथे घराचे बांधकाम सुरू असल्याने दि १०/०८/२२ चे सायकाळी ०६.०० वा. दरम्यान ०८ एमएम चे ०३ बंडल, १० एमएम चे ०४ बंडल, १६ एमएम चे ०२ बंडल, १२ एमएम चे ११ बंडल यांना लोहाच्या संकलीने बांधुन लॉक लावुन आपल्या गावी निघुन गेले होते. दि २२/०८/२२ चे सकाळी १०.०० वा दरम्यान घराचे बांधकाम सुरू करण्याकरीता गेले असता संकल खुली दिसली व ताला तुटलेला दिसला. फिर्यादीने ठेवलेले बंडल चेक केले तर त्यामध्ये १२ एमएम चे ११ बंडल पैकी ०५ बंडल कमी दिसले. फिर्यादीने आजुबाजुला शोध घेतला तर कुठेही ते बंडल दिसले नाही. अज्ञात आरोपीने तेथील ०५ बंडल किंमती अंदाजे २०,०००/—रु. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुधीर मो.नं. ८६९८४०७११४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**